मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

भारतीय प्रजासत्ताक दिन चिरायू होवो !

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी २०२४ । पान १

# आरक्षण मिळाल्याशिवाय माघार नाही!

## आंदोलकांची भावना; जरांगे पाटलांनी आदेश दिल्यास उपोषणास तयार



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

कोणाची शेती दुष्काळामुळे पडीक झालेली, तर कोणी काम ावरून सुटी काढलेली, तर कोणी उतारवयातही आंदोलनात सहभागी होण्यासाठी आलेले... जरांगे पाटील यांच्यासह पदयात्रेत सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोप-यातून मराठा समाजातील बांधव पिंपरी-चिंचवड शहरात दाखल झाले.

सोलापूर, बीड, परळी, विदर्भ, मराठवाडा यासोबतच पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांचाही समावेश होता. जरांगे पाटील यांच्यासोबत मुंबईपर्यंतचा प्रवास करू गरज पडली तर त्यांच्यासोबत उपोषणालाही बसू असा निश्चय या आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

अगदी २१ वर्षांच्या तरुणांपासून ते ८५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटांतील कार्यकर्ते या पदयात्रेत सहभागी झाले आहेत. आता आरक्षण मिळाल्याशिवाय माघार नाही, अशी भावना हे आंदोलनकर्ते व्यक्त करत आहेत.

> “जरांगे पाटील जेव्हा सराटी येथून निघाले त्याच वेळी त्यांच्यासोबत पदयात्रेत सहभागी होण्यासाठी आम्ही गाव सोडले. गावोगावी अठरा पगड जातींच्या लोकांनी आम्हाला निवारा जेवण दिले. आरक्षणाची लढाई अंतिम टप्प्यात आहे. मराठाविरुद्ध ओबीसी वाद हा नेत्यांनी तयार केलेला लढा आहे. स्थानिक पातळीवर मात्र आम्ही सर्व एकत्र आहोत. आता जोपर्यंत जरांगे पाटील आदेश देत नाहीत, तोपर्यंत आम्ही मागे मागे फिरणार नाही.
>
> – गणेश देशमुख, सोलापूर

> “जेव्हा जेव्हा जरांगे आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले, तेव्हा तेव्हा मी त्यांच्या पाठिंब्यासाठी माझ्या गावात उपोषण केले. आज या पदयात्रेत सहभागी होण्यासाठी मी जात आहे. आताही उपोषणालाही बसण्याची आमची तयारी आहे. फक्त त्यांनी आम्हाला आदेश द्यावा. मराठा शेतकरी कुटुंबांतील मुले शिकण्यासाठी व नोकरी मिळण्यासाठी आरक्षण अत्यंत गरजेचे आहे.
>
> – विष्णू बाबा पवार, आंकोली

> “मी शेती करतो. आमच्या नऊ एकर शेतीत आम्ही उसाचे पीक घ्यायचो. मात्र, यावषी दुष्काळ असल्याने पीक निघाले नाही. राज्यात शेतक्याची हीच अवस्था आहे. जरांगे पाटील आमच्यासाठी लढा देत आहेत. त्यामुळे हे आंदोलन आता आमचेही आहे.
>
> – मोहन गव्हाणे, बीड.

# श्रीराममंदीर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त घरकुल चौकात भव्य दीपोत्सव!

## निलेशदादा नेवाळे सोशल फाऊंडेशनतर्फे मिठाईचे वाटप

**मोशी ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदीर प्राणप्रतिष्ठा सोहळा सर्वत्र उत्साहपूर्ण वातावरणात म्हणजे दीवाळीच साजरी करण्यात आली. निलेशदादा नेवाळे सोशल फाऊंडेशनतर्फे पूर्णानगर, शिवतेजनगर, घरकूल चौक परिसरातही भव्य दीपोत्सव, मिठाईचे वाटप,महाप्रसादाचे वाटप करून उत्सव साजरा केला.

प्रभू श्रीरामाचा जयघोष, रांगोळीच्या पायघड्या, फुलांची उधळण, घरावर गुढ्या उभारून, होमहवन, भगव्या टोप्या परिधान करून परिसर चैतन्यमय झाला होता. अबालवृध्दांनी या उत्सवामध्ये सहभाग घेऊन हा सोहळा साजरा केला.

ख-या अर्थाने प्रभू श्रीराम मंदीर प्राणप्रतिष्ठा सोहळा दिवाळीसारखा शहर-परिसरात साजरा झाला. हजारो दिवे लावून परिसर उजळून टारला होता. आमच्या परिसरातील नागरिकही या सोहळ्यात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले.



# 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' अंतर्गत पाय जॅम फाऊंडेशनच्या संगणक विज्ञान मार्गदर्शिकेचे अनावरण

## कार्यक्रमाचे पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने आयोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि महानगरपालिका शाळांचे यश साजरे करण्यासाठी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे जल्लोष शिक्षणाचा २०२४ या कार्यक्रमाचे पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पाय जॅम फाउंडेशनच्या सहाय्याने २५० हून अधिक शिक्षकांचे मूलभूत संगणक आणि कोडींग प्रशिक्षण पूर्ण करून, या सर्व प्रशिक्षित शिक्षकांना वर्गामध्ये मुलांना संगणक विज्ञानाचे धडे देण्यासाठी आवश्यक 'कॉम्प्युटर विज्ञान मार्गदर्शिकेचे' अनावरण खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार उमा खापरे, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उल्हास जगताप, पाय जॅम फौंडेशनच्या प्रांजली पाठक, महेश तोत्रे आणि शुभम बडगुजर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी मांडलेल्या समस्या आणि त्यावर तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुचविलेले उपाय सादर केले होते. सॅनिटरी वेंडिंग मशीन, नदीतून कचरा गोळा करण्याचे यंत्र याचे आ. उमा खापरे यांनी कौतुक केले.

शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी सांगितले की, अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी उपयोग होतो. यामुळे स्पर्धात्मक वातावरण तयार होऊन गुणवत्तेसाठी शाळांमध्ये स्पर्धा होते.




तसेच विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना वाव मिळतो.

आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सर्व महानगरपालिका शाळांना डिजिटल संसाधने उपलब्ध केली गेली असून, त्या संसाधनांचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करण्यासाठी व्हावा यासाठी मनपा आणि पाय जॅम फौंडेशन काम करीत आहे. विद्यार्थ्यांना नव तंत्रज्ञानाचा वापर, क्लिष्ट समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञान आत्मसात करता यावे यासाठी आवश्यक ते किट ३४ माध्यमिक शाळा व भागशाळा यांना मनपा आणि पाय जॅम फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणार आहेत.

शालेय अभ्यासाव्यतिरिक्त मुलांमधील सुप्त गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने इनोवेशन हॅकाथॉन, विज्ञान प्रकल्प, शाळांचे विशेष प्रकल्प व स्वयंसेवी संस्था यांना यावर्षी विशेष स्थान देण्यात आले आहे. पाय जॅम फाउंडेशनने मनपा बरोबर केलेल्या करारानुसार शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, पाय लॅब आणि हॅकाथॉन यासारखे उपक्रम त्या दृष्टीने राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी हॅकॅथॉन सारख्या स्पर्धेमधून तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्यांच्या आजूबाजूच्या समस्या कशाप्रकारे सोडविता येतील याविषयीच्या प्रकल्पांचे उत्तम सादरीकरण केले असल्याचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.

पाय जॅम फौंडेशन सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवणे, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे निर्माते बनण्यासाठी सक्षम करणे, सरकारी शाळांसाठी अभ्यासक्रम विकसित करणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत अनिवार्य कौशल्यांमध्ये शिक्षकांची क्षमता वाढविणे आणि कमी खर्चाच्या संगणक विज्ञान प्रयोगशाळा अर्थात 'पाय लॅब्ज' चालविणे यासारखी समाजहितोपयोगी उद्दिष्टांसाठी २०१७ पासून कार्यरत आहे अशी माहिती पाय जॅम फौंडेशनच्या प्रांजली पाठक यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

# शहर पोलीस दलाच्या लौकिकात भर!

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत बाबर यांना 'राष्ट्रपती पदक' जाहीर

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिसांना विविध पदके जाहीर करण्यात आली. मध्ये पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत बाबर यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपतींचे पदक जाहीर झाले. सोलापूर जिल्ह्याच्या सांगोला तालुक्यातील चोपडी हे मूळगाव असलेले वसंत बाबर यांनी राहुरी विद्यापीठातून एमएस्सी केले आहे. डिसेंबर १९९६ मध्ये उपनिरीक्षक म्हणून पोलीस दलात दाखल झाले. ३ जून २०१४ रोजी पोलीस निरीक्षक पदावर त्यांना बढती मिळाली. मुंबई, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे ग्रामीण पोलीस दलात त्यांनी आजवर कर्तव्य बजावले. सध्या ते पिंपरी-चिंचवड पोलीस दलामध्ये कर्तव्य बजावत आहेत.



आर्थिक गुन्हे शाखा, विशेष शाखा, लाचलुचपत प्रतिबंधक विभागात त्यांनी सेवा केली आहे. सेवा कालावधीमध्ये खून प्रकरणी दाखल असलेल्या संवेदनशील आणि क्लिष्ट सहा गुन्ह्यांची बाबर यांनी उकल केली. तसेच दरोडे, जबरी चोरी, घरफोडी चोरी व इतर मालमत्तेच्या चोरीच्या क्लिष्ट गुन्ह्यांची उकल केलेली आहे. बलात्कार प्रकरणी दाखल तीन गुन्ह्यांतील संशयितांविरुध्द उत्कृष्ट तपास करून दोषारोप दाखल केल्यानंतर सुनावणी दरम्यान संशयिताना शिक्षा झाली. नुकतेच घरफोडी चोरी करणा-या अट्टल चोरट्यास अटक करून १८ घरफोडी चोरीतील एक किलो सोन्याचे दागिने जप्त करण्याची कामगिरी केली. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांना २०२४ चा गुणवत्तापूर्ण सेवेसाठीचे राष्ट्रपती पकद जाहीर करण्यात आले.

वसंत बाबर यांना सेवा कालावधीत आत्तापर्यंत ३५१ बक्षीस व २३ प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले आहेत. २०१४ मध्ये सेवा कालावधीतील गुणवत्तापूर्ण सेवेसाठी महाराष्ट्र राज्याचे 'पोलीस महासंचालक पदक' देऊन बाबर यांना गौरवण्यात आले आहे. तसेच उत्कृष्ट कामगिरीबद्दल पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते देखील बाबर यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# अजित पवारांच्या जुन्नर दौऱ्याला विरोध

## काळे झेंडे दाखवत जोरदार मराठा संघटनांची घोषणाबाजी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** जुन्नर मतदारसंघाच्या दौऱ्यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या ताफ्याला मराठा संघटनांनी काळे झेंडे दाखवल्याची घटना घडली. आरक्षणाच्या मागणीवरुन मराठा समाजाच्या आंदोलकांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. अजित पवार हे पुण्यातील जुन्नर विधानसभेचा दौरा करत असून त्यावेळी ही घटना घडली.अजित पवारांनी मराठा समाजाला उद्देशून केलेल्या वक्तव्याचा निषेधार्ह अहमदनगर-कल्याण महामार्गावरील आळे फाटा परिसरात मराठा संघटनांकडून हे झेंडे दाखवण्यात आले. मनोज जरांगे यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनावेळी अजित पवारांनी हा दौरा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र मराठा समाजाच्या या मागणीला झुगारून अजित पवार दौऱ्यावर आले. त्यामुळं मराठा समाज



आक्रमक झाला असून त्यांनी अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. मराठा आरक्षण लवकरात लवकर मिळावं यासाठी घोषणाबाही केली. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे पहिल्यांदाच जुन्नर विधानसभेचा दौरा करत आहेत. आजवर तटस्थ राहिलेले राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनकेंनी हा दौरा आखला आहे. यानिमित्ताने मतदारसंघात झळकलेल्या फ्लेक्सवर शरद पवारांना स्थान नाही. शरद पवारांनी जुन्नरमध्ये शेतकरी मेळावा घेऊन दोन आठवडे ही उलटले नाहीत, तोवर अतुल बेनके यांनी अजित पवारांच्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केलं आहे. यावरून बेनके आता अजित दादांच्या गटात सामील झाल्याचे संकेत मिळत आहेत. अजित पवारांसोबत महायुतीच्या तिकिटावर शिरूर लोकसभा लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असणारे शिंदे गटाचे नेते शिवाजी आढळरावही उपस्थित आहेत.आतापर्यंत अतुल बेनके हे तटस्थ होते. त्यांनी नेमकी त्यांची भूमिका स्पष्ट केली नव्हती. मात्र काही दिवसांपूर्वी शरद पवारांनी अतुल बेनके यांना जुन्नरमध्ये पर्याय उपलब्ध करून दिला. शरद पवारांनी ऑफर दिली तर जुन्नर विधानसभा मी लढवणार, असं काँग्रेसचे युवा नेते सत्यशील शेरकर यांनी शरद पवार हे जुन्नर दौऱ्यावर असताना म्हटलं होतं. आपली भूमिका जाहीर न केलेल्या अतुल बेनके यांना शरद पवारांनी राजकीदृष्ट्या घेरायला सुरूवात केल्याची चर्चा रंगली होती. हे सगळं घडल्यानंतर लगेच अतुल बेनके यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आता थेट बेनके यांनी अजित पवार गटात सामील होणार असल्याचं जाहीर केलं आहे. जुन्नर हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. या ठिकाणी आमदार अतुल बेनके हे निवडून आले आहेत. आपण कुणाच्याही गटात नाही, आपली निष्ठा फक्त पवार कुटुंबीयांसोबत आहे असं जरी अतुल बेनके म्हणत होते तरी त्यांची अजित पवारांशी जवळीकता सर्वश्रुत होतं. त्यामुळे ते कधीही अजित पवार गटात जातील याची शक्यता नाकारता येत नव्हती अखेर त्यांनी अजित पवार गटात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे.अजित पवारांनी मराठा समाजाला उद्देशून केलेल्या वक्तव्याचा निषेधार्ह अहमदनगर-कल्याण महामार्गावरील आळे फाटा परिसरात मराठा संघटनांकडून हे झेंडे दाखवण्यात आले. मनोज जरांगे यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनावेळी अजित पवारांनी हा दौरा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र मराठा समाजाच्या या मागणीला झुगारून अजित पवार दौऱ्यावर आले. त्यामुळं मराठा समाज आक्रमक झाला असून त्यांनी अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. मराठा आरक्षण लवकरात लवकर मिळावं यासाठी घोषणाबाही केली.

### बेनके अजित पवार गटात

**» पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे पहिल्यांदाच जुन्नर विधानसभेचा दौरा करत आहेत. आजवर तटस्थ राहिलेले राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनकेंनी हा दौरा आखला आहे. यानिमित्ताने मतदारसंघात झळकलेल्या फ्लेक्सवर शरद पवारांना स्थान नाही. शरद पवारांनी जुन्नरमध्ये शेतकरी मेळावा घेऊन दोन आठवडे ही उलटले नाहीत, तोवर अतुल बेनके यांनी अजित पवारांच्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केलं आहे. यावरून बेनके आता अजित दादांच्या गटात सामील झाल्याचे संकेत मिळत आहेत. अजित पवारांसोबत महायुतीच्या तिकिटावर शिरूर लोकसभा लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असणारे शिंदे गटाचे नेते शिवाजी आढळरावही उपस्थित आहेत.आतापर्यंत अतुल बेनके हे तटस्थ होते. त्यांनी नेमकी त्यांची भूमिका स्पष्ट केली नव्हती. मात्र काही दिवसांपूर्वी शरद पवारांनी अतुल बेनके यांना जुन्नरमध्ये पर्याय उपलब्ध करून दिला.**

# जर-तरला अर्थ नाही, मुंबईकडे गाड्यांचे तोंड करून ठेवा

## शिष्टमंडळाच्या भेटीवर मनोज जरांगें पाटीलांची प्रतिक्रिया

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईकडे निघालेल्या मनोज जरांगे यांची आज पुन्हा एकदा भेटीसाठी सरकारचं शिष्टमंडळ पोहचले आहेत. मात्र, शिष्टमंडळासोबत कोणतेही चर्चा झालेली नाही. आपण आधी आंदोलकांशी चर्चा करणार आहोत, त्यानंतरच सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. तर मराठा समाजासोबत झालेल्या चर्चे नंतरच पुढील निर्णय घेणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. ओबीसीमधूनच्या आरक्षणावर आपण ठाम असल्याचे देखील जरांगे म्हणाले आहेत. दरम्यान पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की, जर-तरला अर्थ नाही, आंदोलकांना मुंबईकडे गाड्यांचे तोंड करून ठेवा असे सांगणार आहे. निर्णय झाला तर ठीक अन्यथा चलो मुंबई यासाठी आम्ही तयार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. त्यामुळे, जरांगे आणि शिष्टमंडळात होणारी बैठक



महत्वाची ठरणार आहे. आज शिष्टमंडळ माझ्या भेटीसाठी आले होते. सकाळी आठ वाजता हे शिष्टमंडळ आले. मात्र, मी १० वाजता उठलो. परंतु, आमची कोणतेही चर्चा शिष्टमंडळाशी झालेली नाही. मी आधी आमच्या आंदोलकांशी चर्चा करणार आहोत. आमची चर्चा झाल्यावर शिष्टमंडळ यांच्यासोबत चर्चा करणार आहोत. तोपर्यंत आमच्या वाहनांचे तोंड मुंबईकडे करून ठेवले जाणार आहे. निर्णय झाल्यावर आम्ही पुढे जाणार नाही. आम्हाला मुंबईला जाण्याची हौस नाही, असेही जरांगे म्हणाले आहेत. मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून हालचाली वाढल्या आहेत. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड हे सतत जरांगेंची भेट घेत आहे. दोन दिवसांपूर्वी मधुकरराजे आर्दड आणि छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी आस्तिककुमार पांडेय यांनी रांजणगाव गणपती येथे जरांगे यांची भेट घेतली होती. यावेळी, पहाटे चार वाजता चर्चेला सुरुवात झाली. दरम्यान, जरांगे यांनी काही सूचना दिल्या होत्या. त्यावर निर्णय घेण्यासाठी आज पुन्हा शिष्टमंडळ जरांगे यांच्या भेटीला आले आहेत.मनोज जरांगे यांची आज पुन्हा एकदा भेटीसाठी सरकारचं शिष्टमंडळ पोहचले आहेत. मात्र, शिष्टमंडळासोबत कोणतेही चर्चा झालेली नाही. आपण आधी आंदोलकांशी चर्चा करणार आहोत, त्यानंतरच सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत.

# ललित पाटीलविरुद्ध सात हजार पानांचे आरोपपत्र

## पाटीलला ससूनमधून बाहेर जाण्यास 'याने' केली मदत

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
अमली पदार्थ तस्कर ललित पाटील ससून रुग्णालयातून पसार झाल्याप्रकरणी गुन्हे शाखेने दोन हजार ६०० पानांचे पुरवणी आरोपपत्र न्यायालयात सादर केले. ललित ससूनमधून पसार होण्यास सचिन वाघने मदत केल्याचा उल्लेख आरोपपत्रात करण्यात आला असून, ४५ साक्षीदारांची यादी जोडण्यात आली आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. सी. बिराजदार यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणात आतापर्यंत चार हजार ८०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. ललितच्या मैत्रिणी अर्चना किरण निकम (वय ३३), ॲड. प्रज्ञा अरुण कांबळे ऊर्फ प्रज्ञा रोहित माहिरे (वय ३९), ललितचा भाऊ भूषण (वय ३४ ) साथीदार अभिषेक बलकवडे (वय ३१, सर्व रा. नाशिक), रोझरी एज्युकेशन ग्रुपचा भागीदार विनय अरहाना त्याचा मोटारचालक दत्तात्रेय डोके (वय ४० रा. हडपसर) अशी आरोपपत्र दाखल करण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत. कोठडीतून पसार होणे, कायदेशीर अटक होण्यास विरोध करणे, गुन्हेगारी कट रचणे, पुरावा नष्ट करणे अशा कलमांन्वये आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. चाकणमध्ये मेफेड्रोन बाळगल्याप्रकरणी ललितला ऑक्टोबर २०२० मध्ये अटक करण्यात आली होती. मूत्राशयाच्या विकार झाल्याचे सांगून तो ससून रूग्णालयात उपचार घेत होता.




ससूनमधून त्याने मेफेड्रोनची विक्री करण्यास सुरुवात केली होती. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने ससूनच्या प्रवेशद्वाराबाहेर सापळा लावून दोन कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले होते.अमली पदार्थ विक्री प्रकरणाचा सूत्रधार ललित असल्याचे तपासात उघडकीस आले होते. त्यानंतर ससूनमध्ये उपचार घेणारा ललित २ ऑक्टोबर २०२३ रोजी पसार झाला. पसार झालेल्या ललितला मुंबई पोलिसांनी १७ ऑक्टोबर रोजी अटक केली होती. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी साथीदार सचिन वाघला अटक केली होती. वाघने ललितला ससूनमधून पसार झाल्यानंतर मदत केली होती. आरोपपत्रात ४५ जणांचे जबाब, तसेच साक्ष नोंदविण्यात आली आहे. पोलीस आयुक्त रितेश कुमार, अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई आणि पथकाने तपास करुन ललितसह साथीदारांविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले.अमली पदार्थ तस्कर ललित पाटील ससून रुग्णालयातून पसार झाल्याप्रकरणी गुन्हे शाखेने दोन हजार ६०० पानांचे पुरवणी आरोपपत्र न्यायालयात सादर केले.

### ४५ साक्षीदारांची यादी

**» ललित ससूनमधून पसार होण्यास सचिन वाघने मदत केल्याचा उल्लेख आरोपपत्रात करण्यात आला असून, ४५ साक्षीदारांची यादी जोडण्यात आली आहे.प्रया प्रकरणात आतापर्यंत चार हजार ८०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. ललितच्या मैत्रिणी अर्चना किरण निकम (वय ३३), ॲड. प्रज्ञा अरुण कांबळे ऊर्फ प्रज्ञा रोहित माहिरे (वय ३९), ललितचा भाऊ भूषण (वय ३४ ) साथीदार अभिषेक बलकवडे (वय ३१, सर्व रा. नाशिक), रोझरी एज्युकेशन ग्रुपचा भागीदार विनय अरहाना , त्याचा मोटारचालक दत्तात्रेय डोके (वय ४० रा. हडपसर) अशी आरोपपत्र दाखल करण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत.**

# पार्थ पवार पुण्यातील अट्टल गुन्हेगाराच्या भेटीला

## अजित पवारांकडून पुणे पोलिसांना थेट कानपिचक्या

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पुण्यात भुरट्या गुंडासह अट्टल गुंडगिरीचा कळस सुरु असतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार कुख्यात गुंड गजा मारणेची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे राष्ट्रवादी काँग्रेसमधे आहे. दीड वर्षांपूर्वी जयश्री मारणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधे प्रवेश केला होता. यावेळी जयश्री मारणेंचा नवरा आणि कुख्यात गुंड गजानन मारणेनं पुष्पगुच्छ देऊन पार्थ पवार आणि इतर नेत्यांचे स्वागत केले.जयश्री मारणे या मनसेकडून नगरसेविका राहिलेल्या आहेत. सध्या अजित पवार गटाकडून पुण्यातील विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला जात आहे. कोथरूड विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यासाठी पार्थ पवार, माजी नगरसेवक बंडू केमसे, माजी महापौर दत्ता धनकवडे, माजी नगरसेवक दीपक मानकर हे कोथरूडमधे आले असता त्यांनी जयश्री मारणेंच्या घरी भेट दिली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. गजा मारणे कोथरूड परिसरात शास्त्रीनगर परिसरात आल्यानंतर गुन्हेगारीची मालिका सुरूच आहे. अमोल बधे आणि पप्पू गावडे खून प्रकरणात गजा मारणेला अटक झाली. तो ३ वर्ष येरवडा कारागृहात होता. तो आता मारणे टोळीचा म्होरक्या आहे. या टोळीवर २३ हून अधिक गुन्हे दाखल आहेत. गजा मारणेवर सहापेक्षा अधिक खुनाचे गुन्हे दाखल आहेत. मागील वर्षी पुण्यातील व्यावसायिकाला २० कोटी रुपयांची खंडणी मागणी केल्याप्रकरणात कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. दुसरीकडे, काही दिवसांपूर्वीच अजित पवारांनी पुण्यातील गुंडगिरीवरून पोलिसांना कानपिचक्या दिल्या होत्या. कोण कुणाला गोळ्या घालतो, पण पोलिसांनी तात्काळ कारवाई करत गुन्हेगारांना पकडलं. ससूनमध्ये जे घडलं त्यात कुणाचाच मुलाहिजा बाळगणार नाही, असं गृहमंत्र्यांनी सांगितलेलं आहे, कोणी कितीही मोठा असो, कितीही मोठ्या बापाचा असो त्याला सोडणार नाही. कुठे काही कानावर आलं आणि कोणी काही चुकलं तर देवेंद्रजी सस्पेंड करत नाहीत तर बडतर्फ करतात. त्यांनी सांगितले की, गुन्हेगारांचं उदात्तीकरण थांबलं पाहिजे, चित्रपटांचा परिणाम जाणवत आहे. पुष्पा नाम है मेरा, फुल नही फायर हुं, काय चाललंय? जेलमध्ये असलेल्या कैद्यांचे बाहेर वाढदिवस साजरे होतात. पोलिसांची इभ्रत राहिली पाहिजे. गुन्हेगारांचे होर्डिंग लागतात कसे? पोलिसिंगची पद्धत बदलली पाहिजे. पोलिसांचे गुन्हेगारीवर नियंत्रण राहिलं पाहिजे. पोलिस दलातील भरतीचे निकष बदलण्याची गरज आहे, उंचीची मर्यादा वाढवण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचे ते म्हणाले. पोलिसांच्या शरीरयष्टीवर लक्ष देण्याची गरज आहे, एक महिला पोलिस शरीराने अगदीच किरकोळ असल्याचं निदर्शनास आलं. चोराला कसं पकडणार असं तिला विचारलं तर ब्रेकिंग न्यूज झाली, असेही अजित पवार म्हणाले.